मंत्रालय दवाखान्यास जागेचे वाटप करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्र.शाकाजा-१११७/प्र.क्र.५६/२०१७/२२,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक: १५ मार्च, २०१९

प्रस्तावना :-

मंत्रालय व परीसरातील सरकारी कार्यालयांमध्ये काम करणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांसाठी सरकारी दवाखान्याची सुविधा उपलब्ध आहे. मंत्रालय इमारतीला आग लागण्यापूर्वी सदर दवाखाना मंत्रालयात होता. परंतु मंत्रालय इमारतीच्या नुतनीकरणानंतर सदरहू दवाखाना हा मंत्रालय पोस्ट ऑफीस व मंत्रालय बँकेच्या मधील जागेत स्थलांतरीत करण्यात आला. दवाखाना मंत्रालय इमारतीबाहेर असल्याने रुग्णांना तातडीच्या वेळेस उपचार मिळण्यास विलंब होत होता. त्यामुळे मंत्रालय विस्तार इमारतीच्या तळ मजल्यावरील वाहन गृह क्र. ४७ व ४८ मधील जागेत तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत असलेले मंत्रालय सा.बां. सेवाकेंद्र, मंत्रालय यांचे कार्यालय मुख्य प्रवेशद्वार, मंत्रालय मुख्य इमारतीच्या तळमजल्यावरील पूर्वीच्या जागेत स्थलांतरीत करुन विस्तार इमारतीच्या तळ मजल्यावरील वाहन गृह क्र. ४७ व ४८ ची रिक्त होणारी ५२० चौ.फूट जागा मंत्रालय दवाखान्यास वाटप करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुषंगाने आता शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-

शासन निर्णय :-

मंत्रालय विस्तार इमारतीच्या तळ मजल्यावरील वाहन गृह क्र. ४७ व ४८ मधील जागेत तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत असलेले मंत्रालय सा.बां. सेवाकेंद्र, मंत्रालय यांचे कार्यालय मुख्य प्रवेशद्वार, मंत्रालय मुख्य इमारतीच्या तळमजल्यावरील पूर्वीच्या जागेत स्थलांतरीत करुन विस्तार इमारतीच्या तळ मजल्यावरील वाहन गृह क्र. ४७ व ४८ ची रिक्त होणारी ५२० चौ.फूट जागा मंत्रालय दवाखान्यासाठी वाटप करण्यात येत आहे.

२. कार्यकारी अभियंता, इलाखा शहर (सा.बां.) विभाग, बांधकाम भवन, मुंबई यांनी उपरोक्त जागेचा ताबा संबंधितांना द्यावा व त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३१५१७०६२१७००७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Pradnya Prakash Sawant

Digitally signed by Pradnya Prakash Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=dcab5c13648ccfdd9424ee4584da4e72f3f6f06dfd6b1eaa220fc9de68f36473, cn=Pradnya Prakash Sawant
Date: 2019.03.15 17:07:54 +05'30'

(प्र. प्र. सावंत)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. सर्व सन्माननीय विधानसभा/परिषद व संसद सदस्य
२. मा.सभापतींचे सचिव/मा.अध्यक्षांचे सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

३. विरोधी पक्षनेते, दोन्ही सभागृह, महाराष्ट्र विधान मंडळ, मुंबई
४. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिवांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
५. सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
६. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२.
७. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२.
९. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१०. सह सचिव (का.२२), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
११. कार्यकारी अभियंता, इलाखा शहर (सा.बां.) विभाग, बांधकाम भवन, २ रा मजला, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-०१.
१२. वैद्यकीय अधिकारी, मंत्रालय दवाखाना, मंत्रालय आवार, मुंबई-३२.
१३. उप अभियंता, दक्षिण उपविभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, एम.टी.डी.सी.समोर, मुंबई.
१४. शाखा अभियंता, मंत्रालय शाखा (स्थापत्य), सा.बां. मंत्रालय आवार, मंत्रालय, मुंबई-४०००३२
१५. मंत्रालय सुरक्षा अधिकारी, मंत्रालय आवार, मंत्रालय, मुंबई-३२.
१६. निवडनस्ती.